नि.फौ.ख.क्र. १६/२०२२



सरकार वि. धिरज

नि.क्र. ३०

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि

नाव – दिलीप काशिनाथजी पालवे,

वय – ५३ वर्ष, व्यवसाय – सेंट्रीन,

राहणार – आंबाडी, तह. कुही, जिल्हा – नागपुर.

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

१. मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादी देविदासच्या घरी काम करत असल्यामुळे त्याला ओळखतो. घटना दोन ते तिन वर्षापुर्वी भुगाव येथे देविदास कुंभलेच्या घरी घडली होती. मी घटनेच्यावेळेस आतमध्ये असल्यामुळे घटना काय घडली ते मला माहीत नाही. माझ्यासमक्ष फिर्यादीला मारहाणीची कोणतीच घटना घडली नाही.

**साक्षीदार सर तपासात सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपास सदृश प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली परवानगी देण्यात आली.**

२. मी सेंट्रीनचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की दिनांक २२.१०.२०२१ रोजी देविदास कुंभलेच्या घरी बांधकाम चालु होते. मला हे माहीत नाही की आरोपीचे घर फिर्यादीच्या घराच्या बाजुला आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस फिर्यादीच्या घराचे बांधकाम चालु होते त्यावेळेस त्याच्या बाजुच्या घराचे देखील पॅराफिट वॉलचे काम चालु होते. मला हे माहीत नाही की त्यावेळेस बाजुच्या घरवाल्यांनी त्यांची भिंत पॅराफिटच्या अर्धी विट बाहेर काढली होती. मला हे माहीत नाही की आरोपींनी त्यांच्या ठराविक जागेच्या बाहेर बांधकाम केल्यामुळे या कारणावरुन फिर्यादी आणि आरोपीमध्ये भांडण झाले होते. मला हे माहीत नाही की त्यावेळेस आरोपी हे वर विटा नेत होते किंवा नाही. मला हे माहीत नाही की देविदासने त्यांना अडविल्यामुळे त्यांनी वरुन त्याला विटा फेकुन मारल्या व त्यामुळे त्याचे डोके फुटले

होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी त्यांना माझ्यासमख पाहुन घेण्याची धमकी दिली होती. मला हे माहीत नाही की देविदासने या घटनेबद्दल पोलीसांकडे फिर्याद दिली होती किंवा नाही. पोलीसांनी माझे बयान घेतले नव्हते. त्यांनी फक्त एका कागदावर माझी सही घेतली होती. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग ‘अ’ वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता त्यांनी माझ्या जबाबात तसे का नमुद केले याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझ्या चांगल्या परिचयाचे असल्यामुळे व त्यांच्याशी माझे चांगले संबंध असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी वरिल विचारल्याप्रमाणे कोणतीच घटना न घडल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. एस.एस. राव यांच्यामार्फत – नाकारले.**

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक ०२.०५.२०२४ (ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा